नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/03/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## नरखेड पोलीसांकडुन मोटर सायकल चोरांचा पर्दाफाश

पोलीस स्टेशन नरखेड नागपूर ग्रामीण येथील गुन्हे प्रकटीकरण पथकाने मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अप क्र. ६७/२०२३ कलम ३७९ भांदवि या वाहन चोरीच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीचा कसोशीने शोध घेवुन **ईसम नामे– शामराव उर्फ छोटु प्रेमलाल मांजरीवार वय २१ वर्ष रा. रमना झोपडपट्टी नरखेड ता. नरखेड जि. नागपूर** यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करून त्याने नरखेड शहरातुन चोरी केलेली मोटरसायकल क्रमांक एम. एच–४०/एस.–०२६४ किंमती अंदाजे २०,०००/–रूपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात नरखेड गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आलेले आहे. **(नमुद पथकाने मागील महिन्यातही मोटरसायकल चोरींचा पर्दाफाश करून १४ मोटरसायकली जप्त केल्या आहेत.)**

सदरची कामगिरी ही मा. श्री. विशाल आनंद सा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण, श्री. नागेश जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जयपालसिंग गिरासे ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. हरिषचंद्र गावडे, पोलीस नायक साबीर शेख, पोशि गौरव बखाल, कैलास टेकाडे, राहुल धिमान, शिवदास सौंदळे यांनी पार पाडली आहे.



# <u>जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद</u>

<u>पो.स्टे. सावनेर</u> :— अंतर्गत नागपूर ते सावनेर रोड बोरुजवाडा पुलाजवळ सावनेर येथे दिनांक ०८/०३/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान सावनेर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सावनेर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एम.एच—४०/ए. के.—०१९३ गाडीचे चालक व आरोपी नामे—१) नरेश विश्वनाथ बंसोड, रा. वार्ड क्र.. ०२ खापा, २) कैलास सुदामजी धुर्वे, रा. उमरी जांभळापाणी ता. सावनेर यांनी त्याचे ताब्यातील वाहनाच्या डाल्यामध्ये ४ जिवंत गोवंशीय जनावरे १) एक म्हैस काळया रंगाची किंमती अंदाजे ८०००/— रु. २) एक लालसर भुरकट रंगाची जर्सी गाय किंमती अंदाजे १५०००/— रु. ३) पांढऱ्या भुरकट रंगाचे ०२ गोरे प्रत्येकी किंमती अंदाजे ५०००/— रु. एकुण १००००/—रू. असा एकुण ३३०००/— रुपयाचे जनावरांना दोराने गळयाला निर्दयतेने बांधुन व चारा पाणी न देता महिंद्रा बोलेरो पिकअप गाडी किंमती अंदाजे १,५०,०००/—रू. चे डाल्यामध्ये कोंबुन त्यांना ईजा पोहचतील व गुदमरुन मरेल अशा स्थितीत अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून वाहनासह एकुण किंमती १८३०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— हितांशु प्रमोद ठाकरे, वय २१ वर्ष, रा. कोदेगाव सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम ११ (१) (अ) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, सहकलम ५ (अ) (ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस कायदा, सहकलम ८३/१७७ मोवाका. सहकलम ३४ भा.द.वी. काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १६३९ राजेंद्र यादव मो. नं. ८८८८२१३९३ पोस्टे सावनेर हे करीत आहे.






**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**